■ वर्ष : ०४ ■ अंक: ८ ■ मुंबई, मंगळवार १६ जानेवारी २०१८ ते २२ जानेवारी २०१८ ■ पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 नियम मोडणाऱ्या ५५ हॉटेलांना टाळे

3 → अर्थव्यवस्थेला इंधन दरवाढीची झळ

जागतिक उत्पादन निर्देशांकात भारत तिसाव्या क्रमांकावर ← 4

## २६ जानेवारीला दिल्लीसह देशातील प्रमुख शहरांत हाय अलर्ट

**२६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर देशात गुप्तचर खात्याने हाय अलर्ट जाहीर केला आहे. दिल्लीतील जामा मशिद परिसरात दहशतवादी लपून बसल्याची माहिती गुप्तचर विभागाला मिळाल्यामुळे हा हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. याबरोबरच देशातील इतर प्रमुख शहरातही हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांनी २६ जानेवारीच्या हल्ल्याच्या कटात सहभाग असल्याच्या आरोपाखाली बिलाल अहमद कावा याला शुक्रवारी अटक केली होती. त्या पार्श्वभूमीवर हा इशारा महत्वाचा मानला जात आहे.**



प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभरात ठिकठिकाणी विशेष सुरक्षा व्यवस्था असते. परंतु, दिल्लीतील जामा मशिद परिसरात तीन संशयित दहशतवादी लपले असून ते प्रजासत्ताक दिनी घातपात घडवण्याची शक्यता गुप्तचर खात्याने वर्तवली असल्याने हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार जामा मशिद परिसरात तीन संशयित लपल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांना मिळाली आहे. हे संशयित दहशतवादी मोठ्या घातपाताच्या तयारीत असून ते अफगाणिस्तानचे असल्याचेही गुप्तचर यंत्रणांनी स्पष्ट केलं आहे. काश्मीरच्या पुलगावमधून त्यांना विविध प्रकारच्या सूचना दिल्या जात आहेत. त्यामुळे प्रजासत्ताक दिनाला कोणतीही वाईट घटना घडू नये यादृष्टीने हा हाय अलर्ट देण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांसह इतर तपास यंत्रणाही या घटनेकडे विशेष लक्ष ठेवून आहेत.

प्रजासत्ताक दिनाला दिल्लीमध्ये राजपथावर मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले असते. यामध्ये भारतीय फौजांचे (नौदल, पायदल, वायुसेना) वेगवेगळे सेनाविभाग, घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि इतर अद्ययावत शस्त्रे क्षेपणास्त्रे यांच्याबरोबर संचलन करतात. राष्ट्रपतींना तिन्ही सैन्यदलांकडून मानवंदना दिली जाते. या संचलनाबरोबरच भारतातील विविध संस्कृतींची झलक प्रस्तुत केली जाते. त्यामुळे दिल्लीत कोणतीही अघटीत घटना घडू नये या दृष्टीने हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

## मिरा भाईदर मध्ये हुक्का पार्लर विरोधी स्वाक्षरी मोहीमेला उत्तम प्रतिसाद...



'महाराष्ट्र स्वाभिमान पक्ष' मिरा भाईदर मध्ये राजरोसपणे चालणाऱ्या हुक्का पार्लर विरोधात महाराष्ट्र स्वाभिमान पक्षा तर्फे मिरा भाईदर मध्ये नवघर नाका ऐस.एन.कॉलेज, लोकमान्य टिळक कॉलेज, रिना मेहता कॉलेज या ठिकाणी एकाच दिवशी स्वाक्षरी मोहीम राबविली गेली. मिरा भाईदर वासियांनी या मोहीमेला प्रतिसाद दर्शविला.

## आश्रय ट्रस्ट सलग्न सिनियर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशनच्या वतीने अंधेरी साईवाडी येथे ज्येष्ठ नागरिकांचा प्रती मासिक सभा व सत्कार समारंभ संपन्न





आश्रय ट्रस्ट सलग्न सिनियर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशन च्या वतीने अंधेरी साई वाडी येथे जेष्ठ नागरीकांचा प्रती मासिक सत्कार व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. मागील ४ वर्षांपासून सिनियर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशन चे उपसचिव श्री. संतोष चौधर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास जेष्ठ नागरीकांची दर महिन्याला भर पडत आहे. सदर परिसरामध्ये श्री. संतोष चौधर नियमितपणे जेष्ठ नागरीकांसाठी त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व त्यांचा जन्मदिवस साजरा करण्यासाठी सतत कार्यरत आहे.

उर्वरित पृष्ठ 2 वर

## लॉयन्स क्लब ऑफ मुंबई पॅपीलॉन आयोजित मोफत आरोग्य शिबीर मिरा भाईंदरमध्ये संपन्न










लॉयन्स क्लब ऑफ मुंबई पॅपीलॉनचे प्रेसीडेंट सौ.साधना जोशी पाटील यांच्या प्रयत्नाने बोकार्ड हॉस्पीटल मिरा रोडच्या सहयोगाने दिनांक ९ जानेवारी रोजी सकाळी १० ते २ पर्यंत शॉप नं ७, साई आर्शिवाद बिल्डिंग बेर्वली पार्क, मिरारोड येथे मोफत इ.सी.जी, डायबेटीज, ब्लड प्रेशर, जनरल चेकअप, स्त्री रोग, नेत्र चिकित्सा, शिबीर भरवण्यात आले.

सदर शिबिरात अतिशय गरीब ,अपंग तसेच जेष्ठ नागरीकांनी या शिबिराचा लाभ घेतला या शिबिरामधे श्री. लायन सुरेश दळवी, श्री. लायन सिध्दार्थ पाटील , श्री. लायन मातोडंकर, श्री लायन अजय सावंत व त्यांचे सहकारी यांनी भाग घेतला. या शिबिरामधे साई लिला चॅरिटेबल ट्रस्ट ने सुध्दा सहकार्य केले.

## सौजन्य व्हॉट्सअप






# नियम मोडणाऱ्या ५५ हॉटेलांना टाळे

## ९१३ ठिकाणी बेकायदा बांधकाम तोडले, मुंबई महापालिकेची कारवाई सुरूच

**मुंबई- नियमांचे उल्लंघन करून आगीशी खेळ करणा-या उपाहारगृहांवर कारवाई सुरूच असून शुक्रवारी दिवसभरात ३९७ उपाहारगृहांची तपासणी करण्यात आली. यापैकी मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आलेल्या आठ उपहारगृहांना टाळे ठोकण्यात आले. आतापर्यंत गेल्या १२ दिवसांमध्ये ९१३ उपाहारगृहे, हॉटेल्स, दुकाने आदी ठिकाणी असलेले बेकायदा बांधकाम तोडण्यात आले. तर ५५ हॉटेल्स, उपाहारगृहांना टाळे ठोकण्यात आले.**



कमला मिल कम्पाउंडमधील मोजोज् बिस्टो आणि वन अबव्ह रेस्टो पबमध्ये लागलेल्या भीषण आगीत १४ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेचे तीव्र पडसाद उमटताच महापालिकेने ३० डिसेंबरपासून मुंबईतील हॉटेल्स, रेस्टॉरंटवर धाडसत्र सुरू केले आहे. या कारवाई अंतर्गत नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन करणाऱ्या उपाहारगृहाला नोटीस न देता थेट टाळे ठोकण्यात येत आहे. यामध्ये बऱ्याच मोठ्या हॉटेल्सचा समावेश आहे.

गेल्या १२ दिवसांमध्ये मुंबईतील तब्बल दोन हजार ५६८ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यात मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आलेली ५५ उपाहारगृहे, रेस्टॉरंट सील करण्यात आली आहेत. ७१८ आस्थापनांना तपासणी अहवाल देऊन आवश्यक त्या सुधारणा तातडीने करून घेण्यास बजावण्यात आले आहे. तसेच एक हजार ४१० सिलिंडर्स जप्त करण्यात आले आहेत.

**अशी सुरू आहे तपासणी**

सर्व २४ विभागांमध्ये ५२ पथकांद्वारे ही तपासणी सुरू आहे. या प्रत्येक पथकामध्ये मुंबई अग्निशमन दल, सार्वजनिक आरोग्य खाते आणि इमारत व कारखाने खाते या तिन्ही खात्यांमधील प्रत्येकी एक अधिकारी व आवश्यकतेनुसार संबंधित कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

यात उपाहारगृहातील अग्निसुरक्षाविषयक बाबी नियमांनुसार असल्याची तपासणी अग्निशमन दलाद्वारे तर आरोग्यविषयक बाबींची तपासणी सार्वजनिक आरोग्य खात्यातील अधिका-यांद्वारे करण्यात येते.

तसेच प्रवेशद्वार, मोकळी जागा इत्यादींची तपासणी इमारत व कारखाने या खात्यातील अधिकारी-कर्मचा-यांद्वारे करण्यात येत आहे.

जी दक्षिण येथे प्रभादेवी, दादर या ठिकाणी फूड लिंक रेस्टॉरंट नावाची दोन उपाहारगृहे, एच पश्चिम येथे वांद्रे विभागातील लजीज, वॉण्टन, जाफरान व मार्क्स ॲण्ड स्पेन्सर्स या चार ठिकाणी तर बी वॉर्ड येथे मोहम्मद अली रोड विभागातील आजवा स्वीट व हादीया स्वीट या हॉटेल्स, दुकानांना सील करण्यात आले आहे.

# पोलिसांसमोर रासायनिक अमली पदार्थ शोधण्याचे आव्हान

**मुंबई - एमडीप्रमाणे रासायनिक अमली पदार्थाचा धुमाकूळ रोखणे येत्या काळात अमली पदार्थविरोधी पथकासमोरील मोठे आव्हान असेल. कोकेन किंवा एमडीप्रमाणेच परिणाम करणारे पण अमली पदार्थाच्या सूचीत न येणारे, पर्यायाने पोलीस कारवाई करू शकणार नाहीत, असे मिश्रण तयार करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची माहिती पुढे येत आहे.**

चायना व्हाइट नावाचा अमली पदार्थही याच श्रेणीत मोडतो. एमडी किंवा कोकेनप्रमाणे ग्रॅमच्या हिशेबाने चायना व्हाइटची पूड ग्राहकांच्या हाती ठेवली जाते. त्याचा परिणाम एमडी, कोकेनप्रमाणेच आहे. अमली पदार्थविरोधी पथकातून मिळालेल्या माहितीनुसार चायना व्हाइटचा प्रभाव भारताच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये काही प्रमाणात आढळतो. मात्र मुंबई, महाराष्ट्रात हा अमली पदार्थ पोहोचलेला नाही किंवा ग्राहकांना त्याची फारशी माहितीही नाही.

अनेकदा एखादा रासायनिक अमली पदार्थ लोकप्रिय होतो. मानवी शरीरावरील दुष्परिणाम, अमली पदार्थाच्या व्यवहारातील आर्थिक उलाढाल आणि त्याचा गुन्हेगारी किंवा देशविघातक कृत्यांसाठी होणारा वापर लक्षात घेऊन संबंधित अमली पदार्थ सूचीत सहभागी करून घेतला जातो. त्यानंतर हा पदार्थ बाळगणाऱ्यांविरोधात पोलीस कारवाई करू शकतात. एमडीबाबतही असाच घटनाक्रम घडला. अमली पदार्थविरोधी पथकाचे तत्कालीन पोलीस निरीक्षक गोखले यांनी एमडीचा धोका आधीच ओळखून तो सूचीत सहभागी करून घ्यावा



यासाठी बरीच धडपड केली. जोवर एमडी सूचीत सहभागी नव्हता तोवर पोलिसांना एनडीपीएस कायद्यानुसार कारवाई करणे निव्वळ अशक्य होते.

रासायनिक पदार्थ सूचीत सहभागी झाला की रसायनांचे मिश्रण खालीवर करून, बदलून, दुसरेच रसायन मिसळून नवा रसायनी अमली पदार्थ तयार केला जातो. न्यायवैद्यक प्रयोगशाळेतील चाचणीदरम्यान या मिश्रणाचा अभ्यास केला जातो. त्यानंतर हे मिश्रण सूचीत आहे का याची पडताळणी होते. मात्र सूचीत सहभाग नसल्याने प्रयोगशाळेत धाडलेला पदार्थ अमली पदार्थ म्हणून गणला जात नाही. अशा प्रकारे नवा रासायनिक अमली पदार्थ तयार करणे फार कठीणही नाही. रसायनशास्त्र वा तत्सम पदवीधर, छोटीशी जागा आणि किरकोळ यंत्रसामग्रीच्या जोरावर कुठेही असे प्रयोग होऊ शकतात.

# मुलुंडमध्ये बिबट्याचा हल्ला; सहा जखमी

**मुंबई–** मुलुंडच्या नानेपाड्यामध्ये बिबट्याने हल्ला करून सहा जणांना जखमी केले आहे. नानेपाड्यात पहिल्यांदाच बिबट्यांचं दर्शन झाल्यानं या परिसरात प्रचंड दहशत निर्माण झाली असून येथील एका इमारतीत बिबट्या लपून बसल्याने स्थानिक लोक अधिकच घाबरले होते. दरम्यान, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अधिकारी आणि वन विभागाचे अधिकाऱ्यांनी तब्बल सहा तासांच्या अथक प्रयत्नानंतर या बिबट्याला जेरबंद करण्यात यश मिळविलं आहे.

पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास हा बिबट्या नानेपाड्यात शिरला. त्यानंतर या बिबट्याने केलेल्या ल्ल्यात सहा लोक जखमी झाले. जखमींना वीर सावरकर रुग्णालय आणि सायन रुग्णालायात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. बिबट्या वस्तीत शिरल्याची माहिती कळताच लोकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी करून एकच गलका केला. त्यामुळे हा बिबट्या एका इमारतीत शिरला. या इमारतीच्या बेसमेंट शेजारी असलेल्या टाकीजवळ हा बिबट्या लपून बसला. नानेपाड्यात बिबट्या शिरल्याचं कळताच भाजपचे खासदार किरीट सोमय्या यांनी घटनास्थळी धाव घेऊन लोकांना लांब जाण्यास सांगितले.

लोक दूर जाताच बिबट्या इमारतीच्या बाहेर आला. मात्र लोकांनी ओरडायला सुरुवात केल्याने तो पुन्हा इमारतीत शिरला. सोमय्या यांनी याबाबतचं ट्विट केल्यानंतर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अधिकारी, पोलीस आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वन अधिकाऱ्यांनी या बिबट्याला डार्ट



मारून बेशुद्ध केलं आणि त्याला पिंजऱ्यात डांबलं. तब्बल सहा तास हा थरार सुरू होता. अखेर बिबट्याला ताब्यात घेतल्याने स्थानिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

# शौचालयात डांबून अत्याचार

## गोवंडीत१२ वर्षांच्या मुलीचे अपहरण

**मुंबई–** नृत्य शिकण्यासाठी घराबाहेर पडलेल्या १२ वर्षांच्या मुलीचे अपहरण करून, तिच्यावर सार्वजनिक शौचालयात लैंगिक अत्याचार केल्याची



धक्कादायक घटना गोवंडीत घडली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. दिवसाढवळ्या ही घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली. अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

शिवाजीनगर परिसरात १२ वर्षांची नेहा (नावात बदल) कुटुंबीयांसोबत राहते. येथीलच परिसरात ती नृत्याच्या क्लासला जाते. सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास ती नेहमीप्रमाणे क्लाससाठी घराबाहेर पडली. याचदरम्यान, दोन इमारतींमध्ये असलेल्या मार्गातून जात असताना, एका १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलाची नजर तिच्यावर पडली. त्याने तिचे तोंड दाबून तिला ओढत जवळच्या शौचालयात नेले. तेथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. याबाबत कुणाकडे वाच्यता केल्यास बदनामीची धमकी दिली.

शिकवणीला न जाता मुलीने तेथून घर गाठले. घडलेला प्रकार आईला सांगितला. आईने मुलीला धीर देत, शिवाजीनगर पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.

तिच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिसांनी तरुणाविरुद्ध पॉक्सो, अपहरण, लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यात त्याला ताब्यात घेत, त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आल्याची माहिती शिवाजीनगर पोलिसांनी दिली.

# न्यायदेवतेला मुकी-बहिरी करण्याचा प्रयत्न नको

**मुंबई- सुप्रीम कोर्टाच्या कारभारावर बोट ठेवणाऱ्या कोर्टाच्या चारही न्यायाधीशांचं शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कौतूक केलं आहे. 'हे चारही न्यायाधीश कौतूकास पात्र आहेत. कदाचित त्यांच्यावर कारवाई होईल. पण ही कारवाई पक्षपाती होता कामा नये,' असं शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हंटलं. 'या मुद्दयावर कुणी राजकारण करू नये. न्यायव्यवस्था ही आंधळी असल्याचं म्हटलं जातं. ती निःपक्षपातीपणाने निर्णय देते म्हणून, तिला आंधळी म्हटलं जातं. पण, याच न्याय व्यवस्थेला आंधळी आणि बहिरी करण्याचं काम कोणी करू नये', असं उद्धव ठाकरे यांनी म्हंटलं. शनिवारी शिवसेना भवन येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.**

न्यायाधीशांनी पत्रकार परिषद घेणं धक्कादायक होतं. तरीही या चारही न्यायाधीशांचं कौतूक झालं पाहिजे. मुळात त्यांच्या तक्रारींकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. त्यांच्या तक्रारींच्या खोलात जायला हवं आणि कोणत्याही परिस्थितीत सरकारने हस्तक्षेप न करता तसेच या विषयाचं राजकरण न करता. या तक्रारींचा निवाडा व्हायला हवा, असं त्यांनी सांगितलं. आता न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवायचा की नाही हा लोकांना प्रश्न पडलाय असं सांगतानाच सरकारने न्यायव्यवस्थेला त्यांचं काम करू द्यावं, असं आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केलं आहे.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद मुंबई भेटीवर येत आहेत यावरही उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रपती मुंबईत यावेत असं काय काम आहे? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. 'देशातील लोक आपली जबाबदारी पार पाडत आहेत का? हा प्रश्न निर्माण झालाय. फक्त निवडणुका [illegible] म्हणजेच कारभार होत नाही,' असा टोलाही उद्धव यांनी लगावला.



# आता पोलीस कारभाराची संगणक नोंद

**मुंबई** - शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यात सुरू असलेल्या कारभाराचा हिशोब ठेवण्यासाठी विशेष संगणकीय प्रणाली (सॉफ्टवेअर प्रोग्राम) तयार करण्याचे काम सुरू आहे. या प्रणालीद्वारे पोलीस ठाण्यात आलेल्या व्यक्तींचे तपशील, त्यांच्या तक्रार वा कामाचे स्वरूप, त्यावर करण्यात आलेली कारवाई याची नोंद ठेवली जाईल.

पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार सध्या ही प्रणाली तयार करण्याचे काम सुरू आहे. ही प्रणाली अस्तित्वात आली की शहरातील मोजक्या पोलीस ठाण्यांमध्ये ती प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली जाईल. जर ही प्रणाली यशस्वी ठरली तर ती प्रत्येक पोलीस ठाण्यांमध्ये उपलब्ध करून दिली जाईल.

विशिष्ट वर्गातील आणि मर्जीतील व्यक्तींना पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या कार्यालयांचे दरवाजे सताड उघडे असतात. अधिकारीही त्यांना जास्त वेळ देतात. त्यामुळे पोलीस ठाण्यामध्ये नळावरील भांडणांपासून गंभीर गुन्ह्यांची माहिती, तक्रार, अर्ज, विनंत्या घेऊन आलेल्या सामान्यांना तासन्तास ताटकळत थांबावे लागते. अनेकदा संबंधित अधिकारी नाहीत म्हणून सर्वसामान्यांना माघारी परतावे लागते. तक्रार अर्ज घेतल्यावरही तो बरेच दिवस पोलीस ठाण्यांमध्ये धूळ खात पडून असतो. त्यावर कारवाई होत नाही. गुन्हा नोंदवल्यानंतरही तपासाला सुरुवात होत नाही.

तक्रारींवर कारवाई न होणे, गुन्ह्यांचा वेगवान, पारदर्शक, अचूक तपास न होणे यामुळे जनतेत पोलिसांबाबतचा विश्वास कमी होतो. त्यांच्यातील दरी वाढते. न्यायालयात खासगी तक्रारी, याचिका केल्या जातात. मानवी हक्क आयोग, तक्रार निवारण प्राधिकरणांची पायरी गाठली जाते. यामुळे पोलिसांची प्रतिमा जनमानसात मलिन होत आहे. त्यामुळे पोलीस



ठाण्यात आलेल्या प्रत्येकाला विश्वास निर्माण व्हावा, जास्तीत जास्त तक्रारी पुढे याव्यात, गुन्ह्यांची माहिती पोलिसांना मिळावी या उद्देशाने ही संगणीय प्रणाली तयार करण्यात येत असल्याचे पोलीस दलातील सूत्रांनी सांगितले.

### कारणांचा छडा लागणार

**पोलीस ठाण्यात आल्यानंतर व्यक्तीचे नाव आणि इतर तपशिलांसह येण्याचे कारण, तक्रारीचे स्वरूप, तक्रारीची दखल घेतली का, केलेली कारवाई, अन्य उद्देशाने आलेल्यांना पोलीस ठाण्यातील कोणत्या अधिकाऱ्याला भेटायचे आहे, भेट झाली का, अभ्यागत किती वाजता आला, गेला त्याची नोंद या प्रणालीत ठेवता येईल. या नोंदी ठेवणे सुरू झाल्यास पोलीस ठाण्यात आलेल्या किती तक्रारी, अर्ज विनाकारवाई पडून राहिले, का हे समजू शकेल. तसेच कारवाई काय केली, पुढील प्रगतीही समजू शकेल, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.**



# दंगलींमागे हिंदुत्ववादी संघटना

**कोल्हापूर - कोरेगाव भीमा येथे अभिवादन करण्यास आलेल्या भीमसैनिकांना हिंदुत्ववादी संघटनांच्या वर्चस्ववादातून मारहाण झाली असल्याची टीका भारतीय बहुजन महासंघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार बैठकीत केला. अभिवादन व त्यानंतर पुकारण्यात आलेल्या बंदमध्ये झालेली जाळपोळ मराठा-दलित समाजाने केली नसून, देशाचे राजकारण ताब्यात ठेवण्यासाठी अनियंत्रित आणि नियंत्रित हिंदुत्ववादी संघटनांनी केली असल्याचाही गंभीर आरोप ॲड. आंबेडकर यांनी केला.**

कोरेगाव भीमा येथील घटनेनंतर तीन जानेवारी रोजी झालेल्या घटनेनंतर प्रथमच ॲड. आंबेडकर कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. दौऱ्यात ते सिद्धार्थ नगर येथे भेट देणार होते, पण पोलिसांच्या विनंतीवरून जिल्ह्यातील नागरिकांची गाऱ्हाणे समजून घेवून प्रसार माध्यमांशी संवाद साधला. ॲड. आंबेडकर म्हणाले, 'कोरेगाव भीमा येथे अभिवादन करण्यासाठी पुणे, चाकण व शिरूर असे तीन मार्ग आहेत. त्यापैकी पुणे वगळता चाकण व शिरूर मार्गावरून येणाऱ्या भीमसैनिकांना मारहाण केली. तत्पूर्वी गोविंद गायकवाड यांच्या समाधीवरून वाद निर्माण होत होता. त्यावेळी ३९ जणांवर गुन्हा दाखल करून नऊ जणांना सोडून दिले. पण मारहाण झालेल्या घटनेची पोलिसांनी नोंदही करून घेतली नाही. याविरोधात दोन जानेवारी रोजी गावा-गावातून समाज बाहेर पडला. तीन जानेवारी रोजी पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदला काहीठिकाणी हिंसक वळण लागले. हिंदुत्ववादी संघटनांनी हे जाणीवपूर्वक केले, असून याची सखोल चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी आयोग स्थापन करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केल्याचे आंबेडकर यांनी सांगितले.'

'महाराष्ट्र बंद दरम्यान काही कार्यकर्त्यांवर दरोड्याचे व ३०७ कलम लावले. पोलिसांचा हा आततायीपणा असून, यातून कार्यकर्त्यांची निश्चित सोडवणूक केली जाईल. यासाठी सरकारलाही लक्ष घालावे लागेल. भारतात पाकिस्तानप्रमाणे अंतर्गत यादवी निर्माण होऊ नये, यासाठी हिंदुत्ववादी संघटनातील वर्चस्ववातून निर्माण होणाऱ्या हफीज सय्यद यांना पायबंद घालवा, अन्यथा आम्ही त्याचा बंदोबस्त करू, असा इशाराही दिला. देशासमोर आज मोठे संकट असून यातून यादवी होण्याची शक्यता आहे. यातून एक जानेवारीची हिंसकघटना घडली. अशा घटनामध्ये आततायीपणा केला, तर निवडणुकीमध्ये फटका बसण्याची शक्यता असल्याने नियंत्रित हिंदुत्ववादी संघटना आपला अजेंडा पुढे नेत असल्याचा आरोपही ॲड. आंबेडकर यांनी केला.

**'आठवले पेपर टायगर'**

**कोरगोव भीमा घटनेच्या माध्यमातून आपण नेतृत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आहे, का, या विषयी बोलताना प्रसार माध्यमांनी तयार केलेले पेपर टायगर माझ्यासमोर उभे राहू शकणार नाहीत. मी कालही राजा होतो, आजही राजा आहे, आणि उद्याही राजा राहणार आहे, असे सांगत केंद्रीय समाजीक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांचे नाव न घेता ॲड. आंबेडकर यांनी टोला लगावला.**

-------------(पृष्ठ १ वरुन)-------------

# सिनियर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशनच्या वतीने आश्रय ट्रस्ट सलग्न अंधेरी साईवाडी येथे ज्येष्ठ नागरिकांचा प्रती मासिक सभा व सत्कार समारंभ











या कार्यक्रमामध्ये अंधेरी पोलिस स्टेशनचे श्री. सुनिल गावडे, पी.एस. फाऊंडेशनचे संस्थापक श्री. प्रदीप शर्मा व समाजसेवक श्री. संतोष रहाटे यांनी नेहमी योगदान दिले आहे. सदरच्या कार्य क्रमात वेळोवेळी जेष्ठ नागरिकांना काही भेटवस्तू , अल्पोआहार देण्याचा पुढाकार यांच्यावतीने घेण्यात येतो.

या कार्यक्रमामध्ये वेळोवेळी एकच समस्या सर्व जेष्ठ नागरिकांमध्ये निर्माण होते ती म्हणजे सिनियर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशन या संस्थेने वारंवार जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी एक छोटेसे मैदान किंवा सभा घेण्यासाठी तात्पुरती जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. यासाठी संस्थेने अथक प्रयत्न करुनही प्रशासनाला व साईवाडी गृहनिर्माण करणाऱ्या बिल्डरांना वारंवार कळवूनही जागा उपलब्ध करुन न दिल्याबद्दल खंत वाटते. या कार्यक्रमाच्या वतीने सर्व धर्म समभाव हा दृष्टीकोन सिनियर सिटीझन सोशल राईट्स फाऊ ंडेशन चे पदाधिकारी ठेवतात. दिवसेंदिवस जेष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे त्यांचे प्रयत्न नेहमी अग्रेसर असतात.

# संपादकीय... आतून पोखरलेले जाळे



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

सत्तेवर येणाऱ्या प्रत्येक सरकारला आपण अनंत काळ तेथे राहणार आहोत, असे वाटत असते. त्यामुळे आपल्याला सोयीचे असणारे निर्णय घेताना, आजचे विरोधक भविष्यात सत्तेवर आल्यास त्यांनाही याचा फायदा होऊ शकतो, याचे भान सुटते. राज्यातील नगराध्यक्षांच्या निवडणुका थेट जनतेतून घेण्याचा निर्णय जसा हे भान सुटल्याचे दर्शविणारा होता, तसाच त्यांना सुरक्षाकवच देण्याचा ताजा मंत्रिमंडळ निर्णयही आहे. उलट तो अधिकच गंभीर. राज्यातील बहुतांश नगरपालिकांमध्ये थेट जनतेमधून निवडून आलेले नगराध्यक्ष भारतीय जनता पक्षाचे आहेत. मात्र तेथे बहुमत विरोधी पक्षांचे आहे. त्यामुळे नगराध्यक्षास कोणतेच काम करू द्यायचे नाही, असे बहुमताने ठरवले गेले, तर नगराध्यक्षाची मोठीच कुचंबणा होणे स्वाभाविक आहे. अनेक ठिकाणी बहुमताने नगराध्यक्षाची उचलबांगडी करणेही शक्य होऊ शकते. राज्यातील भाजप सरकारने या नगराध्यक्षांच्या पाठीशी उभे राहण्याचे ठरवले आणि त्यांच्यावर किमान अडीच वर्षे अविश्वास ठरावही आणता येणार नाही, असा निर्णय घेतला. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधी सभागृहाच्या प्रमुखास, म्हणजे महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष यांना कायद्याने कोणतेही थेट अधिकार नाहीत. ती कायमच शोभेची पदे राहिली आहेत. महापौरास आपल्या अधिकारात कोणताही खर्च करता येत नाही. आता सरकारच्या नव्या निर्णयामुळे असे अधिकार थेट जनतेमधून आलेल्या नगराध्यक्षांना मिळणार आहेत. हे असे करणे भविष्यात धोक्याचे ठरू शकते, याची जाणीव सरकारला नाही, असा याचा अर्थ होतो. राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुकांत ३१ ठिकाणी भाजपला सत्ता मिळाली, परंतु ५२ ठिकाणी याच पक्षाचा नगराध्यक्ष थेट निवडून आला. तेथे भाजपचे बहुमत मात्र नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या सर्वसाधारण सभेत बहुमताने होणारे निर्णय तेथील प्रशासनावर बंधनकारक असतात. मुंबई महापालिका अधिनियमांत याही अधिकारांना छेद देण्यात आला आहेच. म्हणजे सर्वसाधारण सभेने बहुमताने घेतलेला एखादा निर्णय लोकविरोधी किंवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे अहित करणारा किंवा आर्थिक नुकसान करणारा असेल, तर त्याची अंमलबजावणी न करण्याचे अधिकार तेथील प्रशासनाचे प्रमुख असलेल्या आयुक्तांना असतात. यास आजपर्यंत जो विरोध झाला, तो लटका होता, त्यामुळे महानगरपालिकांमध्ये महापौरापेक्षा आयुक्त अधिक शक्तिमान राहिला. सरकारच्या नव्या निर्णयामुळे नगरपालिकांमधील नगराध्यक्षांपेक्षाही जिल्हाधिकारी अधिक मोठा बनला आहे. याचे कारण एखाद्या नगराध्यक्षाविरुद्ध अविश्वास ठराव संमत झाला, तर त्याबाबतचा अंतिम निर्णय संबंधित जिल्हाधिकाऱ्याच्या हाती असणार आहे. राज्यातील लोकप्रतिनिधींपेक्षा तेथील प्रशासनास अधिक अधिकार बहाल करणे, हे लोकशाहीच्या मूळ उद्देशांना काळिमा फासणारेच म्हटले पाहिजे. गेली अनेक वर्षे राज्यातील नगरपालिका आर्थिक कोंडीत आहेत. त्यांना त्यांचा उत्पन्नाचा स्रोत नाही. त्यामुळे सरकारी अनुदानाशिवाय तेथील सुधारणांची कामे होऊ शकत नाहीत. त्यामुळे सरकारी भाकरतुकड्यावर अवलंबून असणाऱ्या नगरपालिकांची अवस्था दिवसेंदिवस बकाल बनते आहे.

महाराष्ट्रातील ४५ टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या शहरी भागांमध्ये राहत असली तरीही तेथे मूलभूत सुविधांची वानवा दिसते, याचे कारण नगरपालिका नावापुरत्या शहरी भागात गणल्या जातात. रस्ते, पाणी, वीज या सुविधांशिवाय तेथे उद्योगांना अस्तित्वही मिळू शकत नाही. हे बदलण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्वाधिकार देण्याऐवजी त्यांच्या अधिकारांना अधिकाधिक कात्री लावण्याचे उद्योग मंत्रालयातून केले जातात. अर्थात हा सारा राजकीय सोयीचा भाग असतो. ज्या संस्थांमध्ये विरोधी पक्षांचे बहुमत असते, तेथील महत्त्वाचे निर्णय कसे अडकवून ठेवायचे, हे सरकारी बाबूंना चांगले ठाऊक असते. या साठमारीत निमशहरे असलेल्या नगरपालिकांच्या क्षेत्रात विकासाचे एकही काम उभे राहू शकत नाही. महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या कारभारांबाबत सरकारचे धोरण नेहमीच धरसोडीचे राहिले आहे. कधी बहुसदस्यीय प्रभाग पद्धत, कधी एकसदस्यीय. त्यात बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीत किती सदस्य निवडून द्यायचे हे सूत्र प्रत्येक सरकारगणिक बदलले जाते. तसेच सरकार बदलल्यावर पुन्हा सूत्र बदलते. भाजप सरकार सत्तेत आल्यावर नगराध्यक्षांची थेट निवडणूक घेण्याचा निर्णय झाला. त्याप्रमाणे गेल्या वर्षी निवडणुका पार पडल्या. या निर्णयाचा भाजपला राजकीय लाभही झाला. कारण राज्यात सर्वाधिक नगराध्यक्ष हे भाजपचे निवडून आले. नगराध्यक्ष एका पक्षाचे तर नगरसेवकांमध्ये अन्य पक्षांचे संख्याबळ जास्त हे अनेक ठिकाणी घडले. भाजपचे नगराध्यक्ष असलेल्या निम्म्याहून जादा नगरपालिकांमध्ये विरोधी सदस्यांचे संख्याबळ जास्त आहे. त्यातून नगराध्यक्ष विरुद्ध नगरसेवक हा वाद निर्माण झाला. या वादापायी राज्यातील काही नगरपालिकांचा कारभारच ठप्प झाला. त्यातून मार्ग काढण्याकरिता नगराध्यक्षांना जादा अधिकार देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. कायद्यात बदल करण्याची प्रक्रिया पार पाडण्यास लागणारा विलंब लक्षात घेता अध्यादेशाचा मार्ग स्वीकारण्यात आला. आपल्या पक्षाच्या नगराध्यक्षांना स्थैर्य लाभावे म्हणून घेण्यात आलेल्या निर्णयात म्हणूनच खरी गोम आहे.

# अर्थव्यवस्थेला इंधन दरवाढीची झळ

कच्च्या तेलाच्या दरात होत असलेली वाढ सध्याच्या परिस्थितीला कारणीभूत आहे. गेल्या वर्षी डिसेंबरअखेर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल ६२.२९ डॉलर प्रतिबॅरल दराने विकले जात होते. गेल्या वर्षी जूनमध्ये तर हा भाव प्रतिबॅरल अवघा ४६.१७ डॉलर एवढाच होता. पेट्रोलियम मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात कच्च्या तेलाचा भाव सरासरी ४६.१७ डॉलर होता, तर २०१६-१७ मध्ये सरासरी भाव ४७.५६ डॉलर एवढा होता. या



पार्श्वभूमीवर, जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्चे तेल ८० डॉलर प्रतिलिटर दराने विकले जाऊ लागेल, तेव्हा आपल्याकडील परिस्थिती काय असेल, या कल्पनेनेच वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत. कच्च्या तेलाचे दर आणखीही वाढू शकतात, असे या क्षेत्रातील जाणकार मानतात.

मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून कच्च्या तेलाच्या दरात घट होण्यास सुरुवात झाली; परंतु त्याचा फायदा थेट वाहनचालकांना मिळालाच नाही. याउलट विविध करांचा बोजा पेट्रोल-डिझेलवर चढतच गेला. डिझेलवरील केंद्रीय उत्पादन शुल्कात एप्रिल २०१४ ते एप्रिल २०१६ या दोन वर्षांच्या कालावधीत तब्बल ३८० टक्के वाढ करण्यात आली. प्रतिलिटर उत्पादनशुल्कात ३.५६ रुपयांची वाढ होऊन ते प्रतिलिटर ११.३३ पर्यंत वाढविले गेले. उत्पादन शुल्कात तीन वर्षांत ११ वेळा वाढ करणाऱ्या सरकारने जनतेला दिलासा देताना उत्पादन शुल्कात एकदाच घट केली, तीही अवघी दोन रुपये प्रतिलिटर! पेट्रोलवरील उत्पादनशुल्क २०१४ ते २०१६ या काळात १२० टक्क्यांनी वाढविण्यात आले. २०१४ मध्ये ९.४८ रुपये प्रतिलिटर उत्पादन शुल्क होते, ते २०१६ पर्यंत तब्बल २१.४८ रुपये करण्यात आले. करवाढीचा बोजा वाहनचालकांवर टाकण्यात आणि त्यायोगे एकंदर भाववाढीला कारणीभूत ठरण्यात राज्य सरकारेही मागे राहिली नाहीत. २०१४ मध्ये एकंदर १० राज्यांमध्ये पेट्रोलवर २० टक्क्यांपेक्षा अधिक मूल्यवर्धित कर (व्हॅट)



**तेल उत्पादक आखाती देशांत अस्थिर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पेट्रोलियम पदार्थांचे दर वाढणार हे जेव्हा निश्चित झाले, तेव्हापासून सरकारबरोबरच सामान्य माणूसही धास्तावला आहे. जेव्हा कच्चे तेल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नीचांकी दरात मिळत होते, तेव्हा वेगवेगळे सेस, कर आणि अधिभार लावून केंद्र आणि राज्य सरकारनेही सामान्य नागरिकांना दरकपातीचा फायदा मिळू दिला नाही. वाढलेल्या दराची सवय मोडण्याआधीच करवाढ केली. स्वयंपाकाचा गॅस आणि पेट्रोलच्या दरवाढीवरून वर्षभरापूर्वीच आंदोलन करणारे २०१४ मध्ये सत्तेवर आल्यामुळे लोकांना त्यांच्याकडून दिलाशाची अपेक्षा होती; परंतु ती फोल ठरली. आता संपूर्ण अर्थव्यवस्थाच मंदीच्या सावटाखाली असताना इंधन दरवाढीची झळ अर्थव्यवस्थेला बसणार हे जवळजवळ निश्चित झाले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सध्या कच्च्या तेलाचे भाव गेल्या तीन वर्षांतील सर्वाधिक पातळीवर आहेत. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातच कच्च्या तेलाचा भाव ६९ डॉलर प्रतिबॅरलपर्यंत पोहोचला होता. या वर्षभरात कच्च्या तेलाचे भाव ८० रुपये प्रतिबॅरलचा टप्पा ओलांडू शकतात, असे जाणकारांचे म्हणणे आहे.**

होता. मार्च २०१७ मध्ये अशा राज्यांची संख्या २५ झाली. एप्रिल २०१४ पर्यंत १७ राज्यांत पेट्रोलवर २५ टक्क्यांपेक्षा जास्त व्हॅट होता. मार्च २०१७ पर्यंत अशा राज्यांची संख्याही २५ झाली.

२०१४-१५ मध्ये पेट्रोलियम पदार्थांवरील करांमधून केंद्र सरकारला १,७२,०६६ रुपये कमाई झाली, तर राज्य सरकारांना १,६०,५२६ कोटी रुपये मिळाले. २०१५-१६ मध्ये केंद्र सरकारला २,५८,४४३ कोटी रुपये, तर राज्य सरकारांना १,६०,११४ रुपयांची कमाई झाली. २०१६-१७ मध्ये ३,३४,५३४ कोटी रुपये पेट्रोल-डिझेलवरील करांमधून केंद्र सरकारने कमावले, तर त्याच वर्षी राज्य सरकारांनी १,८९,५८७ कोटी रुपयांची कमाई केली. म्हणजेच, पेट्रोल-डिझेलवरील करांमधून अतिरिक्त कमाई केंद्र सरकारला झाली आणि आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे भाव वाढत असताना केंद्र सरकार करकपातीचे आवाहन राज्य सरकारांना करीत आहे. काही आठवड्यांपूर्वीची राजधानी दिल्लीतील परिस्थिती पाहा. पेट्रोलची मूळ किंमत त्यावेळी २७.६१ रुपये होती. त्यावर विपणनाचा खर्च प्रतिलिटर २.८० रुपये इतका होता. उत्पादन शुल्क २१.४८ रुपये, विक्रेत्याचे कमिशन ३.५७ रुपये, व्हॅट आणि प्रदूषण कर १४.९७ पैसे असून, ग्राहकाच्या गाडीच्या टाकीत पेट्रोल पडत होते, ते ७०.४३ रुपये दराने! आता हा दर ऐंशी रुपयांच्या आसपास पोहोचला आहे. डिझेलच्या बाबतीत १५ सप्टेंबर २०१७ ची परिस्थिती पाहा. मूळ किंमत होती २७.५१ रुपये, विपणन खर्च २.७८ रुपये, उत्पादन शुल्क १७.३३ रुपये, विक्रेत्याचे कमिशन २.५० रुपये, व्हॅट आणि प्रदूषण कर ८.६९ रुपये अशी 'हिस्सेदारी' झाल्यानंतर गाडीच्या टाकीत डिझेल पडत होते ५८.८० रुपये दराने! मूळ किमतीपेक्षा कर अधिक अशीच स्थिती पेट्रोल आणि डिझेलच्याही बाबतीत या आकडेवारीवरून स्पष्ट दिसून येते.

नोटाबंदी आणि जीएसटी हे सरकारचे लागोपाठचे दोन 'सुपरस्ट्रोक' बाजारपेठेवर आघात करून गेले. अर्थव्यवस्था कमालीची मंदावली. त्यानंतर आता काही प्रमाणात अर्थव्यवस्था उभारी घेण्याचा प्रयत्न करीत असतानाच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे भाव वाढू लागले आहेत. नोटाबंदी आणि जीएसटीनंतर देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचे (जीडीपी) सुमारे २ टक्क्यांनी नुकसान झाल्याचे तज्ज्ञ सांगतात. २०१६-१७ चा जीडीपी गृहित धरता, नुकसानीची ही रक्कम ३.०५ लाख कोटी रुपये एवढी आहे. नोटाबंदी आणि जीएसटीनंतर इंधन दरवाढ हा अर्थव्यवस्थेला बसू शकणारा तिसरा मोठा फटका असेल, असे जाणकार सांगू लागले आहेत. या तिसऱ्या फटक्याची तीव्रता कमी करण्यासाठी केंद्र सरकार कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुंबई ते दिल्ली इलेक्ट्रिक कॉरीडोर!

**भाईंदर - मुंबई ते दिल्ली महामार्गावरील एक मार्गिका विजेवर चालणारी करण्यात येणार असून या मार्गिकेवरील इलेक्ट्रिक केबलच्या साहाय्याने अवजड वाहतूक थेट मुंबईत करणे आता शक्य होणार आहे अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मीरा रोड येथे दिली. वसई खाडीवरील वर्सोवा पुलासह विविध विकास कामांचे भूमिपूजन गुरुवारी मीरा रोड येथे करण्यात आले. हा पूल येत्या १८ महिन्यांत पूर्ण करण्याची ग्वाही गडकरी यांनी यावेळी दिली.**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वर्सोवा येथे बांधण्यात येणाऱ्या नव्या खाडी पुलासह ३ हजार कोटी रुपयांच्या सात विकास कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला सहकारमंत्री चंद्रकात पाटील, ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.

रस्त्यावरील वाहतुकीचा वाढता ताण कमी करण्यासाठी विजेवर आधारित वाहतूक व्यवस्था अमलात आणण्याची गरज असून महापालिकांनी त्यानुसार नियोजन करावे. यामुळे वाहतूक कोंडी आणि प्रदूषण यावर मात करता येणे शक्य होणार आहे. केंद्र सरकारने लंडन ट्रान्स्पोर्ट या कंपनीशी नुकताच सामंजस्य करार केला असून याद्वारे प्रवाशांना इलेक्ट्रिकवरच्या दुमजली वातानुकूलित बसमधून अर्ध्या किमतीत प्रवास करता येणार आहे असे गडकरी यांनी यावेळी सांगितले. वरळी ते वांद्रे सागरी मार्ग वर्सोवापर्यंत आणि त्यानंतर थेट वसई विरापर्यंत नेण्यात येणार आहे, अशी माहिती गडकरी यांनी यावेळी दिली.

कंत्राटदारांसोबत झालेला वाद, पर्यावरण विभागाची मंजुरी यामुळे वर्सोवा खाडी पुलाच्या कामाला दोन ते अडीच वर्षे उशीर झाला आहे. मात्र, राज्य सरकारने येथील वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यात सहकार्य केले तर पुलाच्या कामाची मुदत २४ महिने असतानाही तो १८ महिन्यात पूर्ण करण्यात येईल. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी मुंबई-वडोदरा या ३७८ किलोमीटर लांबीच्या २० हजार कोटी रुपयांच्या द्रुतगती महामार्गाचे काम येत्या ३ महिन्यांच्या आत सुरू करण्यात येत असल्याचे गडकरी यांनी यावेळी सांगितले.

ठाणे जिल्हा आणि आसपासच्या अनेक रस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यात येत असल्याची घोषणा यावेळी गडकरी यांनी केली. मुंबईतील विविध जलमार्गाचे प्रकल्प अहवाल तयार असून वसई, गोराई आणि बोरीवली या जलमार्गाच्या कामाची सुरुवात पर्यावरण विभागाची मंजुरी मिळाल्यानंतर सुरू करण्यात येईल. मुंबई ते न्हावा शेवा हा २२ किलोमीटरच्या देशातील सर्वात मोठ्या सागरी सेतूच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले असून येत्या ४ वर्षांत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करून रोजगारनिर्मिती करण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# वर्सोवा खाडीवर नवा पूल

## घोडबंदर मार्गावरील प्रवास सुसाट



**ठाणे** - मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वर्सोवा खाडी पुलामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उतारा म्हणून या ठिकाणी नव्या उड्डाणपुलाची उभारणी केली जाणार आहे. या उड्डाणपुलामुळे वर्सोवा नाक्यावर वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नलची आवश्यकता राहणार नसून येथील वाहतूक विनाअडथळा सुरू राहणार आहे. परिणामी ठाण्याहून मुंबई-अहमदाबाद तसेच मीरा-भाईंदरमार्गे मुंबईच्या दिशेने नियमित ये-जा करणाऱ्यांचा प्रवास सुसाट होणार आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार खाडीवर नव्याने बांधण्यात येणारा पूल थेट वर्सोवा नाका ओलांडून उतरवण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबईहून वसईच्या दिशेने जाणारी तसेच वसईतून मुंबई दिशेने जाणारी वाहने थेट पुलावरून जाण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. महामार्गावरून ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची कोंडी होणार नाही, अशाप्रकारे आराखडा तयार करण्यात आला आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्ग अतिशय वर्दळीचा मार्ग असून गेल्या काही वर्षांत ठाणे, नवी मुंबई तसेच आसपासच्या शहरांमधून मुंबई तसेच वसई-विरार, गुजरातच्या दिशेने जाणारी हजारो वाहने या मार्गाचा वापर करू लागली आहेत. सद्य:स्थितीत वर्सोवा नाक्याजवळचा एक रस्ता सरळ वसईच्या दिशेने आणि एक रस्ता ठाण्याकडे जातो. या मार्गावर गुजरातच्या दिशेने मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक होते. यापैकी बरीच अवजड वाहने ही ठाण्यातील घोडबंदरमार्गे पुढे मुंबई-अहमदाबाद मार्गाच्या दिशेने ये-जा करतात. ठाण्याच्या दिशेने वर्सोवा नाक्यावर जे वळण आहे त्या ठिकाणी वाहनांची मोठी कोंडी होते. शनिवार, रविवार तसेच सलग येणाऱ्या सुट्ट्यांच्या दिवशी वसई-विरार तसेच आसपासच्या परिसरात असलेल्या समुद्रकिनाऱ्यांवर जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी असते. त्यामुळे मोठ्या संख्येने खासगी वाहने या मार्गावर येतात. अशा वेळी वर्सोवा नाक्यापासून घोडबंदपर्यंत या वाहनांची कोंडी होते. मध्यंतरी वर्सोवा खाडीवरील एक पूल बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

# रेल्वे स्थानकांत आगीशी खेळ

**नवी मुंबई - रेल्वे स्थानकांमध्ये केवळ तयार खाद्यपदार्थ विकण्याची परवानगी असताना, नवी मुंबईतील स्थानकांत खुलेआम अन्न शिजवण्यात येत आहे. मुंबईतील कमला मिल येथील अग्नितांडवानंतर सुरक्षेच्या**



**कारणास्तव संपूर्ण नवी मुंबईत हॉटेल, पबवर अग्निसुरक्षेसंदर्भात कारवाई सुरू असताना सिडको मात्र रेल्वे स्थानकांतील स्टॉलचालकांना केवळ नोटीस बजावून स्वस्थ बसली आहे.**

नवी मुंबई शहरातील अनेक रेल्वे स्थानकांत खाद्यपदार्थ विक्रेते सिडकोच्या नियमांची पायमल्ली करत आहेत. सिडकोने १० स्थानकांतील गाळे भाडेकरारावर दिले आहेत. या गाळ्यांमध्ये कोणत्या कृतींवर बंदी आहे, याबाबतची नियमावली आहे, मात्र विक्रेते आणि दुकानदारांनी ती धाब्यावर बसवली आहे. ऑफिससाठी जागा घेतल्याचे दाखवून त्या जागेत मद्यविक्री दुकाने, बार, हॉटेल्स थाटण्यात आले आहेत. अनेक स्थानकांत खुलेआम टेबल-खुर्च्या मांडून जागा अडवण्यात आली आहे. १९९७-९८ पासून या गाळ्यांची विक्री करण्यात आली आहे किंवा ते भाडेतत्त्वावर देण्यात आले आहेत. सिडकोने भाडेतत्त्वावर दिलेले गाळे हे बहुतांश तळमजला वगळून दिले आहेत. परंतु तळमजल्यावर गाळा मिळालेल्यांपैकी अनेक व्यावसायिकांनी दुकानाबाहेरचा परिसर आपलाच समजून हॉटेल व फास्टफूडचे व्यवसाय थाटले आहेत. त्यात रोज अन्नपदार्थ शिजवले जातात. त्यासाठी सिलिंडरचा वापर केला जातो. गर्दीच्या ठिकाणी असलेल्या या सिलिंडरचा स्फोट झाल्यास किंवा अन्न शिजवताना आग लागल्यास दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. जागेचा वापरबदल केल्यामुळे अग्निशमन विभागाच्या परवान्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एखादी दुर्घटना घडल्यास हजारो प्रवाशांचा जीवही धोक्यात येण्याची भीती आहे.

# ठाण्यात बोगस डॉक्टरांना अभय?

**ठाणे**– जिल्ह्यातील गावागावांमध्ये आणि शहरांतील झोपडपट्ट्यांमध्ये अनेक बोगस डॉक्टरांनी आपले हातपाय पसरले असताना बोगस डॉक्टर शोध पुनर्विलोकन समितीला मात्र या डॉक्टरांचा थांगपत्ताच लागत नसल्याची माहिती हाती आली आहे. २०६-१७ या वर्षात ३४ डॉक्टरांवर कारवाई झाली होती. मात्र, यंदा गेल्या नऊ महिन्यांत जेमतेम एक बोगस डॉक्टर या समितीच्या जाळ्यात सापडला आहे. सरकारी यंत्रणांकडून बोगस डॉक्टरांना अभय तर दिले जात नाही ना, असा संशय वैद्यकीय क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त केला जाऊ लागला आहे.

जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर आळा घालण्यासाठी तसेच प्रतिबंधात्मक करावाई करण्यासाठी जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर शोध पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीची दर तीन आठवड्यातून एकदा बैठक होते. या समितीची एक बैठक नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात झाली



यावेळी जिल्ह्यामध्ये वर्षभरामध्ये अवघ्या एका बोगस डॉक्टरला अटक करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. हा डॉक्टर भिवंडी तालुक्यातील असून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या वर्षी मुरबाड तालुक्यात सर्वाधिक १८, भिवंडीत १६, अंबरनामध्ये १ अशा ३४ डॉक्टरांवर कारवाई झाली होती तसेच त्यांच्यावर गुन्हेही दाखल करण्यात आले होते. केवळ भिवंडीतील ५ डॉक्टरांवर गुन्हे दाखल करण्यात आले नव्हते. येथील डॉक्टरांची माहिती मिळाल्यानंतर अवघ्या काही दिवसांत त्यांनी व्यवसाय बंद करून पलायन केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आले नसल्याचे स्पष्टीकरण आरोग्य पर्यवेक्षकांकडून देण्यात आले आहे.

सर्व नियम धाब्यावर बसवून बोगस डॉक्टर आपले दवाखाने दवाखाने थाटतात. त्यांच्याकडे उपचारासाठी येणारा रुग्ण गरीब असल्याने डॉक्टरबाबत अधिक चौकशी करत नाहीत. अनेकदा बोगस डॉक्टरांची फी कमी असते. त्यामुळे त्यांच्याकडे रुग्ण अधिक आकर्षित होतात. कुणाला संशय येऊ नये, यासाठी बोगस डॉक्टर दवाखानेही अद्ययावत थाटलेले असतात. परंतु, यंदा मात्र कोणत्याही तालुक्यामध्ये बोगस डॉक्टर नसल्याचा दावा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बोगस डॉक्टर शोधण्यासाठी जी समिती नियुक्त करण्यात आली आहे त्यात स्थानिक वैद्यकीय अधिकारी आणि पोलिसांचा समावेश असतो. मात्र, बोगस डॉक्टर शोधण्यासाठी त्यांच्यामार्फत कोणतीही ठोस मोहीम राबवली जात नसल्याची माहिती हाती आली आहे.

# मुंब्र्यात आरोपी आणि पोलिसात धुमश्चक्री

**ठाणे– फरार आरोपींना पकडण्यासाठी ठाणे पोलिसांची मदत घेत गुजरात पोलिस मुंब्रा परिसरात धडकले होते. त्यावेळी आरोपीसह त्याचे नातेवाईक आणि इतर तसेच पोलिस यांच्यात धुमश्चक्री उडाली. यामध्ये तीन पोलिस कर्मचारी जखमी झाले असून चौघांना अटक करण्यात आली आहे.**



हातचलाखी करून नागरिकांची फसवणूक केल्याच्या गुन्ह्यातील आरोपी मुस्तफा जाफरी आणि इतर दोघे मुंब्रा परिसरात राहत असून हे सर्व आरोपी इराणी असल्याची माहिती गुजरात पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुजरात पोलिसांचे पथक ठाण्यात आले होते. या पथकात अधिकारी आणि कर्मचारी मिळून ५ ते ६ जण होते. आरोपींना पकडण्यासाठी गुजरात पोलिसांनी मुंब्रा पोलिसांची मदत घेत सोमवारी दुपारी मुंब्रा येथील रशीद कंपाऊंडमध्ये पोलिस पथक आरोपीच्या घरी गेले. पोलिसांनी मुस्तफाला पकडण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांना धक्काबुक्की करून पळण्याचा प्रयत्न करू लागला. तरीही पोलिसांनी मोठ्या हिमतीने पाठलाग करत मुस्तफाला जेरबंद केले. त्याला पकडू नये यासाठी आरोपीच्या नातेवाईकांनी देखील गोंधळ केला. या सर्व प्रकारात तीन पोलिस कर्मचारी जखमी झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. या प्रकरणी मुंब्रा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी मुस्तफा याच्यासह त्याची आई, बहीण आणि पत्नी अशा एकूण चौघांना अटक केली आहे.

# आगामी निवडणुकांतील विजयासाठी भाजपचा दिल्लीत महायज्ञ

**नई दिल्ली- लोकसभा निवडणुका अजून दूर असल्या तरी काहींना आताच या वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांची चिंता लागली असून दिल्लीचे भाजप आमदार महेश गिरी यांनी पक्षाच्या विजयासाठी महायज्ञ करण्याचे ठरवले आहे. विशेष म्हणजे हा महायज्ञ मार्चमध्ये लाल किल्ल्याच्या जवळपास असलेल्या एका ठिकाणी करण्यात येणार असल्याचे पक्षाच्या सूत्रांनी सांगितले.**

दिल्लीचे भाजप आमदार महेश गिरी हे या महायज्ञाचे संयोजक असून या महायज्ञास पंतप्रधान नरेंद्र मोदी व पक्षाध्यक्ष अमित शहा तसेच भाजप राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. देशरक्षणासाठी 'राष्ट्र रक्षा यज्ञ' नावाखाली हा धार्मिक सोपस्कार केला जाणार असून त्यात लोकसभा व राज्यांच्या विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी बागलामुखी देवीचे आशीर्वाद घेतले जाणार आहेत. गिरी यांनी महायज्ञाच्या कार्यक्रमावर काही बोलण्यास नकार दिला असून २२ जानेवारीला सगळे सविस्तर सांगू असे म्हटले आहे. 'आओ एक संकल्प लें, आओ एक आहुती दें' हे या कार्यक्रमाचे घोषवाक्य असून या महायज्ञाची आखणी गिरी यांच्या घरी झालेल्या बैठकीत करण्यात आली. गिरी हे श्रीश्री रविशंकर यांचे शिष्य आहेत. भाजपला राजस्थान, छत्तीसगड, मध्यप्रदेश या राज्यात सत्ता राखता यावी यासाठी महायज्ञ केला जाणार असून कर्नाटकात काँग्रेसकडून सत्ता खेचून घेण्याची शक्ती त्यामुळे भाजपला मिळेल असे संबंधितांना वाटते. या वर्षी या चार राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. या विधानसभा निवडणुकांचा परिणाम २०१९ च्या निवडणुकांवर होणार आहे.



# जागतिक उत्पादन निर्देशांकात भारत तिसाव्या क्रमांकावर

**दिल्ली- जागतिक उत्पादन निर्देशांकात जागतिक आर्थिक मंचाने भारताला तिसावे स्थान दिले आहे. चीन पाचव्या क्रमांकावर आहे. ब्राझील, रशिया व दक्षिण आफ्रिका हे ब्रिक्स देश तुलनेने खाली आहेत. जपानचा पहिला क्रमांक असून जागतिक आर्थिक मंच म्हणजे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने प्रथमच उत्पादन सज्जता अहवाल जाहीर केला असून त्यात दक्षिण कोरिया, जर्मनी, स्वित्झर्लंड, चीन, झेक प्रजासत्ताक, अमेरिका, स्वीडन, ऑस्ट्रिया, आर्यलड हे देश पहिल्या दहात आहेत. ब्रिक्स देशांमध्ये रशिया ३५, ब्राझील ४१, दक्षिण आफ्रिका ४५ व्या क्रमांकावर आहे. भारताचा तिसावा क्रमांक लागला आहे.**

या अहवालातील स्थान ठरवताना औद्योगिक धोरण, सामूहिक कृती हे निकष लावले असून शंभर देशांचे चार गटात वर्गीकरण केले आहे. त्यात अग्रमानांकित, उच्च क्षमताधारी, नव क्षमताधारी यांचा समावेश आहे. भारत हा वारसा गटात हंगेरी, मेक्सिको, फिलीपीन्स, रशिया, थायलंड, तुर्की यांच्यासमवेत आहे. चीन हा अग्रमानांकित देशात असून ब्राझील व दक्षिण आफ्रिका हे नवोदित देशात समाविष्ट आहेत. अग्रमानांकित पंचवीस देशांची उत्पादन क्षेत्रातील स्थिती भक्कम असून हा अहवाल स्वित्झर्लडमधील दावोस येथे होणाऱ्या परिषदेच्या आधी जाहीर करण्यात आला आहे. कुठलाही देश चौथ्या औद्योगिक क्रांतीस सक्षम तयारी असलेल्या वर्गवारीत नाही. भारत हा जगातील पाचवा मोठा उत्पादनक्षम देश असून त्याचे उत्पादन मूल्य २०१६ मध्ये ४२० अब्ज डॉलर्स होते. भारताचे उत्पादन क्षेत्र तीन दशकात ७ टक्क्यांनी वाढले असून त्यामुळे



देशांतर्गत उत्पन्नात १६ ते २० टक्के भर पडली आहे. मानवी भांडवल व शाश्वत साधने ही भारतासाठी दोन महत्त्वाची क्षेत्रे आहेत.

बाजारपेठ आकारात भारत तिसरा असून महिला सहभाग, व्यापार कर, नियामक क्षमता, शाश्वत साधने यात नव्वदावा आहे. उत्पादनाच्या प्रमाणात भारत नववा तर गुंतागुंतीत ४८ वा आहे. भारताचे स्थान श्रीलंका (६६), पाकिस्तान (७४), बांगलादेश (८०) यांच्यापेक्षा चांगले आहे. भारतापेक्षा सिंगापूर, थायलंड, इंग्लंड, इटली, फ्रान्स, मलेशिया, मेक्सिको, रोमानिया, इस्रायल, नेदरलँड्स, डेन्मार्क, फिलिपीन्स, स्पेन यांची कामगिरी जास्त चांगली आहे. चौथ्या औद्योगिक क्रांतीस अनुकूलतेत अमेरिका, सिंगापूर, स्वित्झलड, ब्रिटन, नेदरलँडस हे पहिल्या पाच व चीन २५ वा तर भारत ४४ वा आहे.

# पुण्यातील विमान प्रवाशांची संख्या तीनच वर्षात दुप्पट!

## लोहगाव विमानतळ विस्तारासाठी ६५० कोटींची गुंतवणूक

**पुणे-** पुण्यातील लोहगाव विमानतळावर विमानांच्या उड्डाणांसह मागील तीन वर्षांत प्रवाशांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. २०१४-१५ मध्ये वार्षिक ४१ लाख प्रवासी संख्या आता ८२ लाखांवर पोहोचली आहे. वाढणाऱ्या प्रवासी संख्येमुळे विमानतळाच्या विस्तारीकरणावर सध्या भर देण्यात येत आहे. त्यासाठी ६५० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. त्यातील ४२ हजार चौरस मीटर क्षेत्रफळाच्या नव्या टर्मिनलच्या उभारणीस मंजुरी मिळाली असून, मे महिन्यापर्यंत हे काम सुरू होऊ शकणार आहे. विमानतळ सल्लागार समितीचे अध्यक्ष, खासदार अनिल शिरोळे, विमानतळाचे संचालक अजय कुमार यांनी याबाबतची माहिती दिली.



शिरोळे यांनी सांगितले, की प्रवाशांची वाढती संख्या आणि आवश्यकता लक्षात घेऊन लोहगाव विमानतळावरून सध्या दिवसाला ८७ विमानांचे उड्डाण होते. विस्तारीकरणाच्या प्रकल्पानंतर विमानतळावर दहा विमाने एकावेळी हाताळता येतील. पुणे विमान तळासाठी लागणाऱ्या अतिरिक्त जागेसाठी पाठपुरावा सुरू आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखालील पायभूत सुविधा समितीची बैठक महिनाभरात होईल. त्यामध्ये विमानतळाच्या प्रलंबित कामांबाबत निर्णय होईल. विमानतळासाठी अतिरिक्त जागा, आंतरराष्ट्रीय विमानांच्या धावपट्टीसाठी लागणारी जागा आणि नियोजित पुरंदर विमानतळाविषयी सकारात्मक निर्णय होईल.

# 'अण्वस्त्र हल्ला काय असतो ते दाखवून देऊ' पाकिस्तानची भारताला धमकी

**कराची-** दहशतवाद्यांचे नंदनवन अशी ओळख असलेल्या पाकिस्तानने भारताला आता थेट अण्वस्त्र हल्ल्याची धमकी दिली आहे. पाकिस्तान अण्वस्त्र ल्ल्याची पोकळ धमकी देतोय असे जर भारताला वाटत असेल तर भारतावर आम्ही हल्ला करून अण्वस्त्र हल्ला काय असतो ते दाखवून देऊ असे ट्विट पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री आसिफ ख्वाजा यांनी केले आहे.



पाकिस्तान देत असलेली अण्वस्त्र ल्ल्याची धमकी पोकळ आहे या आशयाचे वक्तव्य लष्करप्रमुख बिपीन रावत यांनी केले. त्याला उत्तर देताना आसिफ ख्वाजा यांनी हे ट्विट केले आहे. भारताच्या लष्करप्रमुखांनी केलेले वक्तव्य अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे. त्यांचे हे वक्तव्य आमच्या अण्वस्त्र ल्ल्याला दिलेले आमंत्रण आहे असेच वाटते आहे. आम्ही पोकळ धमकी देत नाही, भारताला अण्वस्त्र ल्ल्याचा अनुभव हवा असेल तर तो आम्ही हल्ला करून देऊ असा इशाराच आसिफ ख्वाजा यांनी दिला आहे.

# नागपुरात पिस्तुलाच्या धाकाने पोलिसाचा महिलेवर बलात्कार

**नागपूर-** पोलीस दलातील एका शिपायाने एका वर्षाच्या चिमुकलीच्या डोक्यावर पिस्तूल ठेवून तिच्या आईवर बलात्कार केल्याची घटना शनिवारी रात्री खापरी परिसरात घडली. या घटनेने पोलीस दलाच्या प्रतिमेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणी अटक केलेल्या पोलिसाचे नाव रवी जाधव (रा. खापरी, म्हाडा कॉलनी) असे आहे. रवी जाधव २०१४ मध्ये पोलीस दलात रुजू असून सध्या तो मुख्यालयात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहे.



पीडित महिला पती व एका वर्षाच्या चिमुकलीसह खापरीत राहते. पती मिहानमध्ये चालक आहे. जाधव याची महिलेसोबत ओळख असल्याने घरात कोणी नसताना तो अधून-मधून कामानिमित्त तिच्या घरी जात असे. शनिवारी रात्री आठ वाजता पोलीस पोशाखातच तो घरी गेला व शरीर सुखाची मागणी करू लागला. तिने नकार दिल्याने बळजबरी करू लागला. महिलेचा प्रतिकार बघून त्याने जवळची पिस्तूल मुलीच्या डोक्याला लावली. शरीर संबंधास नकार दिल्यास गोळी घालण्याची धमकी दिली. यामुळे मुलीच्या जीवाच्या भीतीने हतबल झालेल्या महिलेचा गैरफायदा घेत जाधवने बलात्कार केला. पतीला ही बाब सांगतो, असे महिलेने सांगितल्यावर तिला पठ्ठ्याने मारहाण केली व वाच्यता केल्यास गोळ्या घालून जीवे मारण्याची धमकी दिली. रात्री नऊला पती घरी येताना त्याला एक व्यक्ती घराबाहेर जाताना दिसली व पत्नीच्या अंगावर मारहाणीच्या खुणा दिसल्या. तिने सर्व हकीकत पतीला सांगितल्यावर ते दोघे सोनेगाव पोलीस ठाण्यात गेले व जाधवच्या विरोधातोक्रार केली.

# तर पतंजली एक ग्लोबल ब्रँड होणार

**मुंबई-** योग गुरू बाबा रामदेव यांच्या पतंजली कंपनीला एक मोठी ऑफर मिळाली आहे. आता ही ऑफर प्राथमिक स्तरात आहे. मात्र या ऑफरनंतर पतंजली एक ग्लोबल ब्रँड म्हणून नावारूपाला येईल. फ्रान्सच्या लग्जरी ग्रुप एलवीएमएचने पतंजली आयुर्वेदात भागीदारी घेण्याची इच्छा वर्तवली आहे. यासाठी ते ५० कोटी डॉलर देण्यास तयार आहेत. एलव्हीएमएच कंपनीनुसार, पतंजली मॉडलमध्ये मल्टीनॅशनल आणि फॉरेन इंव्हेस्टमेंटची इच्छा नसून



कंपनीसोबत बिजनेस करण्याची इच्छा आहे. एलव्हीएमएचसोबत कंपनी आपले प्रॉडक्टस अमेरिका, जपान, चीन, दक्षिण कोरिया आणि युरोपमध्ये विकेल. त्याचबरोबर पतंजली एक ग्लोबल कंपनी होण्यास मदत होईल.

पतंजलीचे एमडी आचार्य बालकृष्ण यांनी सांगितले की, ते कंपनीचा काही भाग विकणार नाही. मात्र पतंजली ५००० कोटींचे कर्ज घेऊ इच्छित आहे. कंपनीला कमी दरात कर्ज मिळण्याची आशा आहे.

# '..अन्यथा २०२४ नंतर मुस्लिमांना देशाबाहेर जावे लागेल'

**कोलकाता-** भारत हे हिंदू राष्ट्र झाल्यानंतर जे मुस्लिम हिंदूंमध्ये मिळून मिसळून राहतील तेच भारतात राहू शकतील, इतरांना बाहेर जावे लागेल असे भाजपचे बैरिया येथील आमदार सुरेंद्र सिंह यांनी म्हटले आहे. शनिवारी रात्री पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले की,



देशात काही मुस्लिम हे देशभक्त आहेत पण जेव्हा भारत हिंदू राष्ट्र होईल तेव्हा मुस्लिमांना आमच्या संस्कृतीत मिळून मिसळून राहावे लागेल तरच ते देशात राहू शकतील, ज्यांना हे पटत नसेल त्यांनी देशाबाहेर जावे. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी हे अवतार पुरूष आहेत. २०२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण होत असून २०२४ मध्ये भारत हिंदू राष्ट्र होईल. मोदी यांच्या नेतृत्वाखाली त्याचवेळी भारत हा महाशक्ती झालेला असेल त्यात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचाही वाटा असणार आहे. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांच्यावर टीका करताना ते म्हणाले की, त्यांच्यात दोन प्रकारची मूल्ये आहेत एक इटालियन व दुसरी भारतीय त्यामुळे ते भारतीय विचारमूल्यांचे नेतृत्व करू शकत नाहीत.

# रेल्वेच्या सामानखोली, लॉकर्स सेवेचे दर वाढणार

**नवी दिल्ली-** रेल्वे प्रवाशांना स्टेशनवर सामान ठेवण्यासाठीची असलेली खोली व लॉकर्स यांचे भाडे आता वाढवण्यात येणार आहे. रेल्वे मंडळाने विभागीय व्यवस्थापकांना स्थानकावरील सामानखोली व लॉकर्सचे भाडे वाढवण्याचे आदेश दिले आहेत. या सेवेचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून त्यासाठी लिलाव पद्धत वापरण्यात येणार आहे. दर वर्षाला या सेवेचे भाडे वाढवण्यात येणार आहे. थोडक्यात लॉकर्स व सामानखोलीच्या सेवेचे आऊटसोर्सिंग करण्यात येणार आहे. सध्या रेल्वेच्या लॉकरचे भाडे २४ तासांना वीस रुपये असून ते अतिरिक्त २४ तासाला ३० रुपये आहे. याआधी ते १५ रुपये होते. सामानखोलीचे भाडे २४ तासांना १५ रुपये आहे ते इ.स. २००० मध्ये सात



रुपये व अतिरिक्त चोवीस तासांना १० रुपये होते. फेब्रुवारी २०१३ मध्ये या भाड्यात सुधारणा करण्यात आली तेव्हा लॉकरचे भाडे चोवीस तासाला १० रुपये तर सामानखोलीचे भाडे १५ रुपये करण्यात आले होते. नवीन धोरण जाहीर झाल्यानंतर सामानखोली व लॉकर्सचे भाडे वाढणार आहे यासाठी खुली लिलाव पद्धत वापरण्यात येणार आहे. नवीन धोरणानुसार विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना लॉकर्स व सामानखोलीचे भाडे ठरवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

# माजी नगरसेविकेने ३६ वर्षापूर्वी झालेल्या लैंगिक छळाची केली तक्रार


**पुणे-** पुण्यातील भाजपच्या माजी नगरसेविकेने ३६ वर्षांपूर्वी झालेल्या लैंगिक छळाबद्दल खडकी पोलीस स्थानकात तक्रार नोंदवली आहे. ही नगरसेविका वयाच्या २६ व्या वर्षी निवडणुकीच्या रिंगणात उतरली होती, त्यावेळी या नगरसेविकेला २० वर्षात कोणत्याही महिलेला मिळाली नव्हती इतकी मते मिळाली होती. सर्वात कमी वयाची नगरसेविका म्हणूनही तिने ओळख मिळवली होती.

या नगरसेविकेने तिच्यावरील अत्याचाराबाबत आजपर्यंत कुठे वाच्यता केली नव्हती. त्यामुळे या पिडीतेने आत्ताच ही तक्रार दाखल का केली याबाबत तिने ज्या व्यक्तीवर आरोप लावला आहे त्या व्यक्तीने शंका उपस्थित केली आहे.




# नोकऱ्या मागणारे नव्हे, देणारे बना!

**भाईंदर-** 'उद्योग-व्यवसायातील छोट्या-मोठ्या संधींचा लाभ घेत नोकऱ्या देणारे बना,' असे आवाहन राष्ट्रपती डॉ. रामनाथ कोविंद यांनी रविवारी केला. उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे आर्थिक जनतंत्र परिषदेच्या (इकोनॉमिक डेमोक्रॅसी कॉन्क्लेव्ह) उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'उद्यमशीलतेला प्रोत्साहन देणे ही केवळ सरकारची जबाबदारी नाही. संस्था, उद्योग परिवार, खासगी बँका, स्वयंसेवी संस्था, माध्यमे यांनी खासगी व्यवसायाला सन्मान मिळेल, अशी संस्कृती आणि वातावरण निर्माण करण्यास हातभार लावला पाहिजे. नोकरी मिळत नाही म्हणून स्वयंरोजगार करावा लागतो, अशी अगतिकता असू नये तर नोकरीतल्या संधी भलेही सोडेन पण स्वत: रोजगार



निर्माता बनेन, स्वत:चा व्यवसाय सुरू करेल अशी भावना त्यामागे हवी', असे राष्ट्रपती म्हणाले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या नॉलेज एक्सलन्स सेंटर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमासाठी राष्ट्रपतींच्या पत्नी सविता, राज्यपाल डॉ. सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शिवप्रताप शुक्ला, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, 'नाबार्ड'चे अध्यक्ष हर्ष कुमार यांचीही उपस्थिती होती.

# संभाजीनगरमध्ये आठवलेंची सभा उधळली

## तुफान घोषणाबाजी, खुर्च्यांची तोडफोड

**संभाजीनगर-** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांची संभाजीनगर येथील सभा उधळण्यात आली आहे. विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रचंड गोंधळ घालण्यात आला. यावेळी उपस्थितांमधून काहींनी तुफान घोषणाबाजी केली. तसेच कार्यक्रम स्थळावरील खुर्च्यांचीही तोडफोड करण्यात आल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. सभेच्या ठिकाणी झालेल्या गोंधळामुळे केंद्रीय



सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांना फक्त ७ मिनिटांत आपले भाषण आटोपते घ्यावे लागले. यावेळी आंबेडकरांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना आठवले म्हणाले की, ते 'राजा' असतील तर, मी 'सरदार' तरी आहे. मला दलित चळवळीमध्ये डावलले जाऊ शकत नाही. ऐक्य होणार असेल तर दुय्यम स्थान स्वीकारण्याचीही आपली तयारी आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)